**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक २** **नि.क्र. २४**

मी शपथपुर्वक निवेदन करतो की :

**माझे नाव :–** कैलास विजयकुमार शानिमे

वय : ३७ वर्षे, व्यवसाय :– नोकरी

राहणार :– शिंगोली, ता.जि. धाराशिव

**अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती ए.एन. निळेकर यांचेमार्फत :–**

**०१.** मला पोलीसांनी पंचनाम्यासाठी दिनांक १०/०९/२०२१ रोजी तुळजापुर मोड या ठिकाणी साधारण दुपारी ०१.४५ वाजण्याच्या सुमारास बोलविले होते. पोलीसांनी माझ्या समक्ष तेथील घटनास्थळाचा पंचनामा तयार केला. त्या पंचनाम्यातील मजकुर मी वाचला आहे, त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी २५** देण्यात येतो. त्यावेळेस माझे सोबत दुसरा पंच जगदीश वाघमारे हा पंच उपस्थीत होता.

**०२.** घटनास्थळ हे तुळजापुर मोड या ठिकाणी औसा येथे आहे. घटनास्थळाच्या पुर्वेला हॉटेल बसवेश्वर, पश्चिमेला तुळजापुर महामार्ग, दक्षिणेला निलंगाकडे जाणारा रस्ता आणि उत्तरेला लातूरकडे जाणारा रस्ता आहे.

**आरोपीतर्फे उलटतपास विद्वान विधीज्ञ श्री वाय.डी. जगताप यांचेमार्फत :–**

**०३.** माझे मुळ गाव निलंगा आहे. मी पंचनाम्याच्या दिवशी धाराशिव येथे होतो. मला सकाळी ११.०० च्या सुमारास पंचनाम्यास येण्याकरीता पोलीसांनी फोनवरुन सांगितले होते.

**०४.** मी व फिर्यादी एकाच शाळेमध्ये नोकरीला आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ माझ्या परिचयाचे आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्यावेळेस तेथील रस्त्याचे काम सुरु होते. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळी वाहनांची रहदारी असते.

हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळी वाहने वेग कमी करुन जात असतात. हे म्हणणे खरे नाही की, सदरच्या पंचनाम्यातील मजकुर खोटा नमुद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी हा माझा सहकारी असल्यामुळे त्याला मदत करण्याकरीता आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपुर्ण मजकुर मी खोटा सांगितला आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PARAG PHADNIS AWATE
Date: 2026.08.01 16:13:04 +0530

**( श्री. पी. पी. आवटे )**

**दि. ०१/०८/२०२६** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, औसा**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक १** **नि.क्र. २२**

मी शपथपुर्वक निवेदन करतो की :

**माझे नाव :–** संतोष कुंडलिक पालमपल्ले

वय : ४० वर्षे, व्यवसाय :– नोकरी

राहणार :– शिंगोली, ता.जि. धाराशिव

**अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती ए.एन. निळेकर यांचेमार्फत :–**

**०१.** मी आरोपीस ओळखतो. सदर घटना दिनांक ०९/०९/२०२१ रोजी औसा येथील औसा मोड या ठिकाणी सार्वजनिक रस्त्यावर साधारण दुपारी ०२.०० वाजण्याच्या सुमारास घडली होती. माझे वडील माझे गावी आले होते आणि ते परत जात असताना त्यांनी माझी मुलगी गंगाश्री संतोष पालमपल्ले आणि राजश्री संतोष पालमपल्ले यांना घेवुन निलंगा येथे सणासाठी बसने जात होते. ते औसा मोड येथे बसने उतरले. तेथुन निलंगा मोड कडे जात असताना त्यावेळेस निलंगाच्या बाजुने आलेल्या एका टिप्पर वाहन नं. एम.एच. २४ एफ ९८२६ या गाडीने भरधाव वेगात येवुन माझी मुलगी राजश्री हिला धडक दिली. त्या धडकेमुळे राजश्री ही गंभीर जखमी झाली. तिला जोरात दुखापत झाल्यामुळे ती जागीच मयत झाली. त्यावेळेस माझ्या वडीलांना देखील सदर वाहनाचा जोरात धक्का बसला. माझ्या वडीलांनी मला फोनवरुन घटनेबाबत माहिती दिली. त्यावेळेस मी माझ्या शाळेत होतो. त्यानंतर माझे वडील कुंडलीक रघुनाथ पालमपल्ले हे देखील बेशुध्द पडले. त्यांच्या डोक्याला दुखापत झाली होती. त्यानंतर मी मुलीला दाखल केले त्या ठिकाणी औसा ग्रामीण रुगणालयात गेलो. त्यावेळेस तेथे मुलगी मयत झाली होती. मी औसा पोलीस स्टेशन येथे घटनेबाबत फिर्याद दिली. आता ती फिर्याद मला दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी २३** देण्यात आला. पोलीसांनी माझा घटनेबाबत पुरवणी जबाब घेतला होता. आरोपीस मी ओळखतो. आरोपी न्यायालयात हजर आहे.

**<u>आरोपीतर्फे उलटतपास विद्वान विधीज्ञ श्री वाय.डी. जगताप यांचेमार्फत</u> :–**

**०२.** माझे निलंगा गाव असल्यामुळे बऱ्याच वेळेला औसा येथे जाणे येणे असते. हे म्हणणे खरे नाही की, सन २०२१ साली सदर राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरु होते. हे म्हणणे खरे नाही की, औसा मोड या ठिकाणी रस्त्याच्या एका बाजुचे काम पुर्ण झाले होते व एका बाजुचे काम अपुर्ण होते. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ हे रहदारीचे ठिकाण आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळी रस्त्याच्या आजुबाजुला हॉटेल व पानपट्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, तेथुन तुळजापुर, औसा व निलंग्याकडे जाणारे वाहनांचे चालक चहा पिण्यासाठी थांबत असतात.

**०३.** घटना घडली त्यावेळेस माझ्या वडीलांचे वय साधारण ५८ वर्षे होते. हे मला सांगता येत नाही की, घटनेच्या वेळेस माझे वडील कोठुन, कुठे चालले होते. मला दुपारी ०१.०० नंतर वडीलांचा फोन आला होता. माझ्या वडीलांनी ते औसा गाडीत बसले असल्याचे सांगितले.

**०४.** हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मुलीने वडीलांचा हात सोडला असल्यामुळे ती रस्त्यावर गेली व तिला आणण्यासाठी माझे वडील गेले होते. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या बाजुला हॉटेल बसवेश्वर असुन तेथुन निलंग्याकडे जाणाऱ्या काळ्या पिवळ्या रंगाची वाहने असतात. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांना वार्धक्यामुळे समजत नसल्यामुळे तसेच मुलगी अचानक रस्त्याच्या मध्ये गेल्यामुळे तिला वाचवण्यासाठी दोघे जण रस्त्यामध्ये गेले होते.

**०५.** हे म्हणणे खरे नाही की, आरोपी विलास तुळजापुरे याचेकडुन कोणतीही अपघाताची घटना घडली नाही. आरोपीस मला पोलीसांनी दाखवले होते. माझी दुसरी मुलगी गंगाश्री हिला कोणतीही दुखापत झाली नव्हती.

**०६.** हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मुलगी व वडीलांचेबाबत अपघाताचे क्लेमचे प्रकरण जिल्हा न्यायालय उस्मानाबाद येथे दाखल केले आहे. हे म्हणणे खरे

आहे की, सदर प्रकरणामध्ये मला नुकसान भरपाई मिळाली आहे. हे म्हणणे खरे नाही की, क्लेमचे पैसे मिळण्यासाठी मी आरोपीविरुध्द खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपुर्ण मजकुर मी खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by
PARAG PHADNIS AWATE
Date: 2026.08.01
16:13:10 +0530

**( श्री. पी. पी. आवटे )**

**दि. ०१/०८/२०२६** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, औसा**